**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद**

**विद्यापरिषदेतून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या दोन सदस्यांकरिताची निवडणूक**

**<u>प्रपत्र - अ</u>**

**मा.कुलगुरू तथा निवडणुक अपीलीय अधिकारी यांचे आदेश**

प्रस्तुत विद्यापीठाच्या विद्या परिषदेची बैठक दिनांक ३०.०९.२०२३ आयोजीत केली असुन सदर बैठकीत महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३० (४)(ञ) मधील तरतुदीप्रमाणे विद्यापरिषदेने तिच्या सदस्यांमधुन दोन सदस्य व्यवस्थापन परिषदेवर निवडुन देणेकरीता निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. सदर जाहीर केलेल्या निवडणुक कार्यक्रमाप्रमाणे इच्छुक उमेदवारांनी त्यांचे नामनिर्देशनपत्रे कुलसचिव तथा निवडणुक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर केले असुन छाननी प्रक्रियेनंतर वैध उमेदवारांच्या नावांची यादी दिनांक १८.०९.२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे आणि वैध उमेदवारांची अंतिम यादी दिनांक २५.०९.२०२३ रोजी प्रसिद्ध करावयाची आहे. परंतु तत्पुर्वी प्रस्तुत अपीलार्थी डॉ. श्रीमती आर. एम. गुळवे यांनी डॉ. अपर्णा पाटील यांच्या नामनिर्देशनपत्रावर आक्षेप नोंदविला असुन त्यांचे नामनिर्देशनपत्र अवैध करावे म्हणुन त्यांनी अपिलाद्वारे विनंती केली आहे.

प्रकरणात जाहीर केलेल्या निवडणुकीच्या कार्यक्रम पत्रिकेप्रमाणे आज दिनांक २२.०९.२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणी करीता डॉ. गुळवे अनुपस्थित आहेत मात्र डॉ. पाटील व कुलसचिव तथा निवडणुक निर्णय अधिकारी उपस्थित आहेत. नैसर्गीक न्यायाच्या दृष्टीने उपस्थित पक्षास बाजु मांडण्याची पुरेशी संधी देण्यात आली आहे.

**सुनवाणी दरम्यान कुलसचिव तथा निवडणुक निर्णय अधिकारी यांनी मांडलेले मुद्दे-**

कुलसचिव तथा निवडणुक निर्णय अधिकारी यांनी नमुद केले की, अर्जदार डॉ. गुळवे यांच्या म्हणण्याप्रमाणे कलम ३० (४)(ञ) चा अर्थ उकल करता येणार नाही. विद्यापरिषदेतील सदस्यांपैकी कलम ३२ (३)(छ) प्रमाणे निवडुन आलेल्या अध्यापक सदस्यांमधुन एक व महीला सदस्यांपैकी एक अशी दोन सदस्य व्यवस्थापन परिषदेकरीता निवडुन द्यावयाची आहेत. करीता डॉ. गुळवे यांच्या विनंतीला कायदेशीर आधार नसल्याने ती फेटाळण्याची विनंती केली आहे.

**डॉ. आर. एम. गुळवे यांच्या अपिलातील मुद्दे-**

डॉ. गुळवे सुनावणीकरिता अनुपस्थित असल्याकारणाने अभिलेखावरील त्यांचे म्हणने लक्षात घेण्यात आले आहे. विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३० (४)(ञ) प्रमाणे विद्या परिषदेतुन

व्यवस्थापन परिषदेवर निवडुन द्यावयाच्या दोन्ही सदस्यांची पात्रता ही कलम ३२ (३)(छ) प्रमाणे केवळ *'निवडुन आलेले अध्यापक'* अशी असणे गरजेचे आहे. डॉ. गुळवे यांनी पुढे असेही नमुद केले की, डॉ. पाटील ह्या विद्या परिषदेमध्ये हिंदी विषयाच्या अभ्यासमंडळाच्या अध्यक्ष म्हणुन सदस्यपदी आलेल्या असुन त्या निवडुन आलेल्या अध्यापक नाही आणि म्हणुन प्रस्तुतच्या निवडणुकीकरीता त्या वैध उमेदवार असु शकत नाहीत. सदर अपिलाच्या शेवटी त्यांनी त्यांचे अपील मंजूर करुन डॉ. पाटील यांचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्याची विनंती केली आहे.

**सुनावणी दरम्यान डॉ. अपर्णा पाटील यांनी मांडलेले मुद्दे –**

डॉ. अपर्णा पाटील यांनी प्रत्यक्ष हजर राहून सुनावणी दरम्यान त्यांचे नामनिर्देशनपत्र योग्य असल्याचे नमुद करुन विद्यापीठ अधिनियमातील कलम ३० (४)(ञ) प्रमाणे सदर निवडणुक लढविण्याकरीता त्या पात्र असल्याचे नमुद करुन डॉ. गुळवे यांचा प्रस्तुतचा अर्ज / अपील खारीज करण्याची त्यांनी विनंती केली.

## <u>निष्कर्ष</u>

मी डॉ. गुळवे यांनी अभिलेखावर दाखल केलेला अर्ज / अपील व सोबतची सहपत्रे बारकाईने पाहिली व तपासली. यानुषंगाने कुलसचिव तथा निवडणुक निर्णय अधिकारी यांचे व डॉ. पाटील यांनी मांडलेले मुद्दे देखील समजुन घेतले. डॉ. गुळवे यांनी डॉ. पाटील यांच्या नामनिर्देशनपत्रावर नोंदविलेल्या आक्षेपाप्रमाणे विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३० (४)(ञ) प्रमाणे विद्या परिषदेच्या सदस्यांना त्यांच्यातुन व्यवस्थापन परिषदेकरीता दोन सदस्य निवडुन द्यावयाचे असुन सदर दोन्ही सदस्य कलम ३२ (३)(छ) प्रमाणे विद्या परिषदेवर निवडुन आलेल्या अध्यापकांमधुनच असणे आवश्यक असल्याचे नमुद केलेले दिसुन येते. सदर प्रकरणातील महत्वाचा मुद्दा हा विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३० (४)(ञ) शी जोडलेला दिसुन येतो. करीता सदर तरतुद पाहणे गरजेचे ठरते. महाराष्ट्र राज्याच्या कायदेमंडळाने सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ म्हणुन - महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६, मराठी भाषेत पारित केलेला असुन त्याअर्थी कलम ३० (४)(ञ) ची तरतुद मुळ स्वरुपातच वाचने आवश्यक आहे. सदर अधिनियमात पुढील प्रमाणे तरतुद नमुद केल्याचे दिसुन येते –

*'३० .....*

*(४) ....*

*(ञ) विद्या परिषदेने तीच्या सदस्यांमधुन निवडुन दिलेले दोन सदस्य, ज्यापैकी एक सदस्य परिषदेच्या सदस्य असलेल्या निर्वाचीत अध्यापकांमधील असेल व दुसरा सदस्य ही महिला असेल.'*

वरील नमुद तरतुद पाहता निवडुन द्यावयाच्या दोन सदस्यांपैकी ती सदस्ये विद्या परिषदेत असलेल्या सदस्यांच्या कोणत्या गटांपैकी असतील ते स्पष्ट केलेले आहे. सदर तरतुदीतील *'ज्यापैकी*

*एक सदस्य परिषदेच्या सदस्य असलेल्या निर्वाचीत अध्यापकांमधील असेल'* असे नमुद आहे. याचा अर्थ दोन सदस्यांपैकी केवळ एक सदस्य हा निर्वाचीत अध्यापकांमधील असणे बंधनकारक केल्याचे दिसते शिवाय सदर तरतुदीतील अंतिम भाग *'व दुसरा सदस्य ही महिला असेल'* यावरुन दुसऱ्या सदस्याकरीता पात्रता केवळ तो सदस्य *'महिला'* असणे आवश्यक असल्याचे दिसते. सदर तरतुदीचा बारकाईने अभ्यास केला असता या दोन सदस्यांपैकी एक सदस्य हा निर्वाचीत अध्यापकांपैकी असणे आवश्यक असल्याचे स्पष्ट होते. कायदेमंडळास जर सदर दोन्ही सदस्य निर्वाचीत अध्यापकांमधील असावेत असा अर्थ अपेक्षीत असता तर सदर तरतुदीत *'ज्यापैकी **एक सदस्य** परिषदेच्या सदस्य असलेल्या निर्वाचीत अध्यापकांमधील असेल'* असे नमुद न करता सदर दोन्ही सदस्य विद्या परिषदेतील निर्वाचीत अध्यापकांमधील असेल व त्यापैकी एक महीला असेल असे नमुद केले असते. त्याअर्थी डॉ. गुळवे ज्या पद्धतीने उक्त नमुद तरतुदीची अर्थ उकल करत आहे ती समर्थनीय ठरत नाही, असे माझे मत झाले आहे.

करीता मी प्रा. डॉ. प्रमोद गोविंद येवले, कुलगुरू तथा निवडणुक अपीलीय अधिकारी म्हणुन डॉ. आर. एम. गुळवे यांनी दाखल केलेल्या अर्जावर / अपीलावर पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**अ.** डॉ. आर. एम. गुळवे यांनी डॉ. अपर्णा पाटील यांच्या नामनिर्देशन पत्रावर नोंदविलेला आक्षेप फेटाळण्यात येतो व कुलसचिव तथा निवडणुक निर्णय अधिकारी यांनी डॉ. अपर्णा पाटील यांच्या नामनिर्देशनपत्राच्या वैधतेबाबत घेतलेला निर्णय योग्य ठरविण्यात येते.

**ब.** कुलसचिव तथा निवडणुक निर्णय अधिकारी डॉ. अपर्णा पाटील यांचे नाव वैध उमेदवारांच्या यादीत समाविष्ट करण्याचे निर्देश देण्यात येत आहे.

**क.** प्रस्तुत संचीका बंद करुन अभिलेख कक्षास वर्ग करण्यात यावे.

दिनांक : २२.०९.२०२३

**कुलगुरू तथा**
**निवडणुक अपीलीय अधिकारी**